स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जिल्हा परिषद धुळे.

जाहीर प्रकटन

सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३

**जिल्हा परिषद धुळे अंतर्गत गट - क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**

**जाहिरात क्रमांक ०१/२०२३**

जिल्हा परिषद धुळे च्या आस्थापनेवरील गट -क संवर्गामधील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात क्र.०१/२०२३ दिनांक ०५/०८/२०२३ अन्वये प्रसिध्द करण्यांत येत आहे.

प्रस्तुत जाहिरातीमधील पदे जिल्हा परिषद धुळे च्या अधिनस्त असलेल्या विविध विभागांमधील आहेत.त्यामुळे सदर निवेदनाव्दारे कळविण्यांत येते की,जाहिरात क्र.०१/२०२३ नुसार गट-क मधील विविध संवर्गाच्या रिक्त पदांकरिता **अर्ज करण्यांचा कालावधी दिनांक ०५/०८/२०२३ पासुन दिनांक २५/०८/२०२३ रोजी पर्यंत आहे.**

**पदभरतीसाठी घोषित केलेली संवर्गनिहाय सरळसेवेची रिक्त पदे**

| अनु क्रमाक | संवर्ग | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% ( हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी ) | ५९ |
| ३ | आरोग्य परिचारिका [आरोग्य सेवक (महिला) ] | २०६ |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | ०७ |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | ०५ |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (बांधकाम) | ०६ |
| ७ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी ) | ०१ |
| ८ | मुख्य सेविका / पर्यवेक्षिका | ०८ |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | ११ |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०३ |
| ११ | वरिष्ट सहाय्यक (लेखा) | ०३ |
| १२ | विस्तार अधिकारी(कृषि) | ०१ |
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम /लघु पाटबंधारे) | ४१ |
| एकुण | | ३५२ |

इच्छुक उमेदवारांनी https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ या लिंकवर **दिनांक २५/०८/२०२३** रोजीचे रात्री **२३.५९** वाजेपर्यंत Online पध्दतीने अर्ज करावा .उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने **रिक्त पदांचा तपशिल, पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी, वयोमर्यादा, परीक्षा शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्यांची पध्दत , अर्ज करण्यांची मुदत व इतर आवश्यक अटी व शर्ती** इत्यादी बाबी **मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील संकेतस्थळ** https://dhule.gov.in **व** https://dhulezp.mahapanchayat.gov.in **या धुळे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर** पाहण्यांस उपलब्ध आहे.

**मदतीकरीता जिल्हा परिषद धुळेच्या ०२५६२/२४०१८८ या दुरध्वनी क्रमांकावर दि.५ ते २५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.**

दिनांक ०४ /०८/२०२३

स्थळ- धुळे

सही/- XXX

सदस्य

जिल्हा निवड समिती गट क

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद,धुळे.

सही/- XXX

अध्यक्ष

जिल्हा निवड समिती गट क

तथा जिल्हाधिकारी धुळे

जिल्हा परिषद, धुळे
जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत गट क मधील
सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात
जाहिरात क्रमांक :- ०१/२०२३

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं१२२२/प्र.क्र. ५४/का.१३-अ दिनांक ०४ मे २०२२, महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०२२/ प्र.क्र.११/आस्था-८ दिनांक १० मे २०२२ महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ.पु.क. दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दिनांक २१ ऑक्टोबर २०२२, महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र पदनि-२०२२/प्र.क्र.२०/२०२२ /आ.पु.क दि.३१ ऑक्टोबर २०२२ , महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दिनांक १५ नोव्हेंबर २०२२, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं१२२२/प्र.क्र.१३६/का-१३ ब दिनांक २१ नोव्हेंबर २०२२, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.४२७/१६ ब/ दिनांक १० मे २०२३ ,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५ मे २०२३, अन्वये विहीत तरतूदी आणि निर्देशानुसार जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत गट-क मधील सर्व संवर्गाची (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) विविध विभागाकडील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदे **अनुसूचीत क्षेत्राबाहेरील ( बिगर पेसा ) व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.४२७/१६-ब, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२३ नुसार मा. राज्यपाल महोदयांच्या दि. २९ ऑगस्ट २०१९ च्या अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरणेबाबत सूचना प्राप्त आहेत. त्यानुसार शासन निर्णयामध्ये नमूद १३ जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) रिक्त पदांची भरती** करीता प्रस्तूत जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

सरळसेवेने भरावयाच्या पदाकरीता https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत. **उमेदवारांनी मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील संकेतस्थळ https://dhule.gov.in व https://dhulezp.mahapanchayat.gov.in या धुळे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सविस्तर जाहिरात वाचून त्याप्रमाणे विहीत मुदतीत अर्ज सादर करावेत. ऑनलाईन भरलेल्या अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

**सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील संकेतस्थळ https://dhule.gov.in व https://dhulezp.mahapanchayat.gov.in या धुळे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातील नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून ऑनलाईन (Online) पध्दतीनेच https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रिये संबंधित आवश्यक अद्ययावत माहिती प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**


www.shikhoshikhao.com

- **अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) यामध्ये कोण अर्ज करू शकतात.**

जे उमेदवार महाराष्ट्राचे रहिवासी आहेत, असे उमेदवार आणि महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मकसी१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुले २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) पदांसाठी अर्ज करू शकतात.

- **अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) यामध्ये कोण अर्ज करू शकतात.**

१. शासन अधिसुचना दि. २९/०८/२०१९ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यांत येतील.

२. स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवार" याचा अर्थ, जे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे वैवाहीक साथीदार किंवा ज्यांचे मातापिता किंवा आजी-आजोबा हे दिनांक २६ जानेवारी १९५० पासून आजपर्यंत संबंधित जिल्हयांच्या अनुसूचित क्षेत्रांत सलगपणे राहत आले आहेत, असे अनुसूचित जमातीचे उमेदवार, असा आहे.

३. अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांकडे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक (मुळ) रहिवासी असल्याबाबतचा महसुली पुरावा असणे आवश्यक आहे तसेच सदर उमेदवारांनी अंतिम निवड झाल्यानंतर त्यांना नियुक्ती देण्यापुर्वी त्यांनी अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक रहिवासी असल्याबाबत सादर केलेल्या महसूली पुराव्याबाबत पडताळणी केली जाईल.त्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रात (पेसा) नियुक्ती दिली जाईल.

४. अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) अनुसूचित जमाती अतिरिक्त अन्य संवर्गाची पदे ही स्वतंत्रपणे दर्शविण्यांत आलेली नसून परिशिष्ट -१ मध्ये सामाजिक व समांतर आरक्षणांत एकत्रित दर्शविण्यांत आलेली आहेत.

५. महाराष्ट्र शासन ,आदिवासी विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक आविवि-२०२३/प्र क्र.१३२/ का-१४ दिनांक १६/०६/२०२३ अन्वये प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचा रहिवासी दाखला सादर करणे आवश्यक राहील.

६. ज्या उमेदवारांची पेसा क्षेत्रामध्ये निवड होईल त्या उमेदवारांची बिगर पेसा क्षेत्रामध्ये बदली करता येणार नाही.

७. जाहिरातीमध्ये अनुसुचीत क्षेत्रातील भरावयाची पदे ही महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी/२०१८/प्रक्र.४२७/१६-ब. दि.१० मे २०२३ नुसार दर्शविणेत आलेली आहेत.

**१. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरू होण्याचा दिनांक | ०५/०८/२०२३ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | २५/०८/२०२३ |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | २५/०८/२०२३ |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परिक्षेच्या आधी ७ दिवस |

परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमुद केले जाईल. परीक्षेचे प्रवेशपत्र हे परीक्षेपूर्वी ७ दिवस आधी https://dhule.gov.in व https://dhulezp.mahapanchayat.gov.in या संकेतस्थळावर 'Date For Call Letter Download' या टॅबवर क्लीक करून प्राप्त करून घेता येईल.

- अर्ज करण्यांसाठीची महत्वाची सुचना

अ) राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये शक्यतो एकाच कालावधी मध्ये पदनिहाय संगणकीकृत परिक्षा होणार असल्यामुळे उमेदवाराने एकाच पदाकरीता अनावश्यक जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज करू नये .असे केल्यांस अर्ज शुल्कापोटी उमेदवारांचा अनावश्यक खर्च होण्याची शक्यता आहे.

ब) भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र हे संगणकीकृत नियंत्रणेव्दारे तयार होणार असल्यामुळे उमेदवारांने एका संवर्गासाठी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांना अर्ज केले असल्यांस व परिक्षा प्रवेश पत्रानुसार उमेदवारांला एकाच वेळेस अन्य ठिकाणी परिक्षेचा क्रमांक आल्यांस व त्या ठिकाणी परिक्षा देता न आल्यांस त्यांस ही जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

**२. परीक्षा शुल्क**

२.१ खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. १०००/-

२.२ मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. ९००/-

२.३ अनाथ उमेदवारांसाठी रु ९००/-

२.४ माजी सैनिक/ दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहिल.

२.५ फक्त ऑनलाईन पध्दतीनेच परीक्षा शुल्क स्विकारले जाईल.

२.६ परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ऑनलाईन चलनाची (पावती ) प्रत ही ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाच्या प्रतीसोबत कागदपत्रांच्या तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२.७ उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिराती मधील एकापेक्षा अधिक पदाकरिता अर्ज करावयाचा असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करून त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहिल.

**३. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सुचना**

३.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://dhule.gov.in व https://dhulezp.mahapanchayat.gov.in या लिंकवर जाउन जाहिरात सविस्तर अभ्यासावी

३.२ उमेदवारास अर्ज सादर करतांना काही समस्या उध्दभवल्यास http://www.cgrs.ibps.in/ या लिंकवर अथवा १८००२२२३६६/१८००१०३४५६६ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

३.३ ऑनलाइन फी भरणेसाठी **दि.२५/०८/२०२३ रोजी वेळ २३.५९ पर्यत मुदत राहील.**

३.४ अर्जात हेतूपुरस्कर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या

अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

३.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल.

३.६ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवारांची पात्रता ठरविणेत येईल.

३.७ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीची (Grade) यादी सादर करावी.

३.८ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.
२. अर्ज सादरीकरण
३. शुल्क भरणा

३.९ **प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**

१. https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ या संकेतस्थळावर वापरकर्त्यांने प्रोफाईल निर्मिती करण्याकरिता "नवीन वापरकर्त्यांची नोंदणी " ( " Click here for New Registration" ) वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्यांचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग- इन पृष्ठद्वारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलद्वारे माहिती भरतांना उमेदवाराने स्वत:चाच वैध ई-मेल आयडी, वैध भ्रमणध्वनी क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्यांने स्वत:च्या Login व Password द्वारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील इतर माहिती , शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे:-

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रूंदी ३.५ से.मी X उंची ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करून खालीलप्रमाणे अपलोड करावी.

१. एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहीत आकाराचा फोटो चिकटवावा, फोटोवर स्वाक्षरी करू नये अथवा फोटो साक्षांकीत करू नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा., स्टॅपल अथवा पिनिंग करू नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२. फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.

फोटो रूंदी ३.५ से.मी

फोटो उंची ४.५ से.मी

३. छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रूपाशी जुळणारे असावे.

४. विहीत आकार / क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाही.

५. वरील प्रमाणे विहीत आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करू नये.

६. स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यांत येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**A. अर्ज नोंदणी**

१. उमेदवारांनी **https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/** या संकेतस्थळावर जावून ''APPLY ONLINE'' या पर्यायावर क्लिक करा जे एक नवीन स्क्रीन उघडेल.

२. अर्ज नोंदणी करण्यासाठी, '' नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा'' **(Click here for New Registration)** टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल-आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरत्या नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ईमेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

३. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो '' सेव्ह आणि नेक्स्ट'' (Save & Next) टॅब निवडून आधीच एंटर (Enter) केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट (Submit) करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी '' सेव्ह आणि नेक्स्ट'' (Save & Next) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे-आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टीहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशिलांची पडताळणी करून घ्यावी.

४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी. कारण '' पूर्ण नोंदणी '' **(COMPLETE REGISTRATION BUTTON)** बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही / करणे शक्य होणार नाही.

५. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे /तिचे वडील/पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहीलेले असावे, जसे ते प्रमाणपत्र / गुणपत्रिका /ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/ तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

६. '' तुमचे तपशील सत्यापित करा '' (Validate your details) आणि ''जतन करा आणि पुढील ''(Save & Next) बटणावर क्लिक करून तुमचा अर्ज जतन करा.

७. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्यांची कार्यवाही करावी.

८. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पुर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी ''पूर्वावलोकन'' (Preview) टॅब वर क्लिक करा.

९. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशिल बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पुर्ण वर क्लिक करा. (COMPLETE REGISTRATION)

१०. '' पेमेंट '' ( Payment ) टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व '' सबमिट '' (Submit) बटणावर क्लिक करावे.

**B. परीक्षा शुल्क भरणे**

ऑनलाईन मोड:-

१. डेबिट कार्ड (Rupay/Visa/MasterCard/Maestro), क्रेडीट कार्ड, इंटरनेट बँकिग IMPS, कॅश कार्ड्स/ मोबाईल वॉलेट वापरून पेमेंट केले जाऊ शकते.

२. व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर, एक -ई-पावती तयार होईल.

३. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.

४. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआउट घेणे आवश्यक आहे.

**C. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड (Upload of Photo /Signature) करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे.**

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा/तिचा फोटो , स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

**छायाचित्र प्रतिमा: (रूंदी ३.५cm X उंची ४.५cm)**

- छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.
- हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढ-या, पार्श्वभूमीच्या विरुध्द घेतलेले असावे.
- टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.
- परिणाम २०० X २३० पिक्सेल (प्राधान्य )
- फाईलचा आकार २०kb-५०kb दरम्यान असावा.
- स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०kb पेक्षा जास्त नसावा.

स्वाक्षरी

- अर्जदाराला काळया शाईच्या पेनने पांढ-या कागदावर सही करावी लागेल.
  * परिणाम १४०X६० पिक्सेल (प्राधान्य )
  * फाईलचा आकार १०kb-२०kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०kb पेक्षा जास्त नाही याची खात्री करा.

**कागदपत्रे स्कॅन करणे:-**

* स्कॅनर रिझोल्युशन किमान २०० dpi वर सेट करा.
* रंग (True colour) सेट करा

**कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया**

- ऑनलाईन अर्ज भरतांना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.
- संबधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा " (Upload of Photo /Signture)
- तुमचा फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.

१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यांस उमेदवाराचा अर्ज नाकारला जावू शकतो.

२. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत ते तपासावे.

३. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.

**टिप:- ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी.**

३.१० अर्ज सादरीकरण

१. सदर अर्ज **https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/** या संकेतस्थळावर **दिनांक ०५/०८/ २०२३ रोजी पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.**

२. कृपया लक्षात घ्या की, उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाईन पध्दतीने अदा करावे

**३.११ सर्वसाधारण सुचना**

१. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवारांने करणे .

२. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यांत आला असला तरी संगणक प्रक्रियेकरीता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.संक्षिप्तपणे (Abbreviations ) वा अद्याक्षरे ( initials ) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद करावा.नावाच्या / पत्त्यांच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

३. महिला उमेदवारांनी त्यांच्या नांवात काही बदल असल्यांस (लग्नापूर्वीचे नाव,लग्नानंतरचे नांव ) या संदर्भात आवश्यक कागदपत्रे ,विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.

४. एस.एस.सी.अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत . त्यानंतर नांव बदलले असल्यांस अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यांस,त्यासंबधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

५. पत्रव्यवहारासाठी स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा .व्यावसायीक मार्गदर्शन केंद्र,स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र /वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शन केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

६. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास / न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

७. संबधित पदाच्या/ परीक्षेच्या जाहिरात/ अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

३.१२ वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध टरविण्यात येतील.

३.१३ उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे. तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास जिल्हा परिषद, धुळे जबाबदार राहणार नाही.

३.१४ उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

३.१५ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा

३.१६ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ **https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. या व्यतिरीक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही. यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३.१७ विहीत दिनांकानंतर व विहीत वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

३.१८ वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला , माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

३.१९ ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे. अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

## ४. परिक्षा

४.१ जाहिरातीत नमुद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) **https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/** या संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान ७ दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र संकेतस्थळावरून काढून घ्यावे.

४.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशापत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवागनी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेशपत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी .

४.३ **परीक्षा केंद्र**

१. २. ३.

**उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रामधून परिक्षा केंद्र निवडावे**

**(* सदरची परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने संगणकावर विविध सत्रांत घेणेत येणार असल्याने उमेदवाराने निवडलेले परिक्षा केंद्रच उमेदवाराला मिळेल.याची हमी देता येणार नाही , याची उमेदवारांनी नोंद घ्यावी या बाबत कोणतीही तक्रार विचारांत घेतली जाणार नाही. )**

४.४. ऑनलाईन परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०४ मे २०२२ अन्वये कागदपत्रे पडताळणीकरिता बोलावण्यात येईल.

४.५ काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये /परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती **https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/** व **मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील संकेतस्थळ https://dhule.gov.in व https://dhulezp.mahapanchayat.gov.in या धुळे जिल्हा परिषदेच्या** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४.६ ओळख पटवणे

१. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport)/ वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID ) आधार कार्ड ,बँक/पोस्ट फोटोसहितचे पासबुक/ फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विदयापीठ / कॉलेज चे फोटोसहीत ओळखपत्र /बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक /पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे.उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक /उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल.जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यांस किंवा ओळख शंकास्पद असल्यांस त्यांला परिक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.सदर उमेदवारांचे मुळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायांप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

टिप- उमेदवाराने परिक्षेला उपस्थित राहतांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परिक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव ( परिक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार ) सोबत सादर करण्यांत येणा-या ओळखपत्रांशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे.ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.सदर महिला उमेदवरांनी नांवात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे परिक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यांत आलेले फोटो ओळखपत्र यांमधील नावात कोणतीही तफावत आढळल्यांस उमेदवारांस परिक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही .

**रेशनकार्ड , शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.**

२. परिक्षेला उशिरा येण्याबाबत परिक्षेच्या प्रवेशपत्रात परिक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परिक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.प्रवेशपत्रावरील परिक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे.परिक्षेची वेळ जरी दोन तास ( १२० मिनिटे ) असली तरी उमेदवारांस ओळख पटविणे , आवश्यक कागदपत्रे गोळा करणे,सुचना देणे, या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहावे लागेल.

३. निवड प्रक्रिये दरम्याण गैरवर्तणूक /अनुचित प्रकार / गैरप्रकार करतांना दोषी आढळलेल्या उमेदवरांवर करण्यांत येणारी कार्यवाही.उमेदवाराने त्यांच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशील देवू नये.खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करून सादर करू नये .किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये जर उमेदवारांने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारांस अपात्र ठरविण्यांत येईल व योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

४.७ **परिक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्याण जर उमेदवराने**

१. अनुचित प्रकार करणे किंवा.
२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,
३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,

४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा, स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा, दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,

५. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरेरावी करणे उध्दटपणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे.अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.

(१). जिल्हा परिषद धुळे तर्फे घेण्यात येणा-या वेगवेगळया परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधीत (Debarred) केले जाईल.

(२) जर उमेदवार जिल्हा परिषद धुळे च्या सेवेत आधीच रूजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

## ५. परिक्षा केंद्र

५.१ १. सदर परीक्षा प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर ''ऑनलाईन'' पध्दतीने परीक्षा घेतली जाईल

२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक , वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.

३. उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी /नुकसानीस जिल्हा परिषद धुळे जबाबदार राहणार नाही.

## ६. पदसंख्या

६.१ जिल्हातंर्गत गट- क मधील खालील तक्त्यात नमूद केलेल्या विविध संवर्गाच्या संख्येप्रमाणे भरावयाच्या सर्व पदांचा तपशिल सोबतचे **परिशिष्ठ १** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

६.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल ( कमी/ वाढ ) होण्याची शक्यता आहे. तसेच सदरील जाहिरातीमध्ये दर्शविण्यांत आलेल्या एकूण रिक्त पदांमध्ये संभाव्य रिक्त पदे समाविष्ट करण्यांत आलेली आहेत. उमेदवारांच्या निवड प्रक्रियेनंतर रिक्त असणा-या पदांवर तात्काळ नियुक्ती देण्यांत येईल.त्यानंतर जसजशी पदे रिक्त होतील त्या प्रमाणे रिक्त होणा-या पदांवर निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूक देण्यांची कार्यवाही नियुक्ती प्राधिकारी करतील.

६.३ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यांस याबाबतची घोषणा / सूचना वेळोवेळी कार्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेल्या घोषणा / सूचनांच्या आधारे प्रस्तृत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यांत येईल.

६.४ खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (बांधकाम / ग्रामिण पाणी पुरवठा) संवर्गामध्ये दर्शविलेली पदे ही काही जिल्हा परिषदांमध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (बांधकाम) म्हणून कार्यरत आहेत.तर काही जिल्हा परिषदांमध्ये स्वंतत्ररित्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम ) व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (ग्रामिण पाणी पुरवठा ) अशा रितीने कार्यरत आहेत.तथापि सदर जाहिरातीमध्ये दर्शविलेली पदे ही बांधकाम व ग्रामिण पाणी पुरवठाची एकत्र करून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम/ग्रामिण पाणी पुरवठा ) अशी नमूद केलेली आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम ) व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (ग्रामिण पाणी पुरवठा) या संवर्गाचा सेवाप्रवेश नियम एकच असल्यामुळे सदर पदाची एकच परीक्षा घेणेत येईल.त्यानंतर निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचा गुणानुक्रम , समांतर / सामाजिक आरंक्षण व त्यांचा प्राधान्य ( विकल्प ) याचा विचार करून कागदपत्र पडताळणीचे वेळी बांधकाम किवा ग्रामिण पाणी पुरवठा यामध्ये नियुक्ती देणेची जिल्हा परिषदेकडून कार्यवाही केली जाईल.

६.५ खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (बांधकाम /लघु पाटबंधारे ) संवर्गामध्ये दर्शविलेली पदे ही काही जिल्हा परिषदांमध्ये स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक ( बांधकाम ) म्हणून कार्यरत आहेत.तर काही जिल्हा परिषदांमध्ये स्वतंत्ररित्या स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (बांधकाम ) व स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (लघु पाटबंधारे ) अशा रितीने कार्यरत आहेत.तथापि सदर जाहिरातीमध्ये दर्शविलेली पदे ही बांधकाम व लघु पाटबंधारे ची एकत्र करून स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक ( बांधकाम / लघु पाटबंधारे ) अशी नमूद केलेली आहेत.

स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक ( बांधकाम ) व स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (लघु पाटबंधारे ) या संवर्गाचा सेवाप्रवेश नियम एकच असल्यामुळे सदर पदाची एकच परीक्षा घेणेत येईल.त्यानंतर निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचा गुणानुक्रम , समांतर /सामाजिक आरक्षण व त्याचा प्राधान्य (विकल्प) व त्याचा विचार करून कागदपत्र पडताळणीचे वेळी बांधकाम किंवा लघु पाटबंधारे यामध्ये नियुक्ती देणेची जिल्हा परिषदेकडून कार्यवाही केली जाईल.

**पदभरतीसाठी घोषित केलेली संवर्गनिहाय सरळसेवेची रिक्त पदे**

| अनु क्रमाक | संवर्ग | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरूष) ५०% ( हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी ) | ५९ |
| ३ | आरोग्य परिचारिका / [आरोग्य सेवक (महिला) ] | २०६ |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | ०७ |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | ०५ |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (बांधकाम ) | ०६ |
| ७ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी ) | ०१ |
| ८ | मुख्य सेविका / पर्यवेक्षिका | ०८ |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | ११ |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०३ |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ०३ |
| १२ | विस्तार अधिकारी(कृषि) | ०१ |
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम /लघु पाटबंधारे) | ४१ |
| एकुण | | ३५२ |

( टिप- १) सोबतचे परिशिष्ट १ मध्ये दर्शविलेले पदांमध्ये समांतर आरक्षणातर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे (दिव्यांग व माजी सैनिक यांचेसाठी राखीव पदे वगळून ) पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यांस त्याच सामाजीक प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यांत येईल.

**७. पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता**

७.१ सरळसेवेने भरावयाच्या पदांची शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | ज्यांनी मान्यता प्राप्त विदयापिठांची विज्ञान शाखेतील पदवी धारण केलेली असेल आणि ज्यांनी बहुउददेशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठयक्रम यशस्वी रित्या पुर्ण केला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशाने नेमणूक करण्यांत येईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण झालेले उमेदवार, राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणुन ९० दिवसांचा अनुभव धारकांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>ज्यांनी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल तर अशा उमेदवारांनी सदर प्रशिक्षण नियुक्ती नंतर तीन संधीत यशस्वीरीत्या पुर्ण करणे आवश्यक राहिल. |
| ३ | आरोग्य परिचारिका [ आरोग्य सेवक (महिला) ] | ज्यांची अर्हता प्राप्त सहाय्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदवीका धारण करणारे आणि औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६०% गुणांसह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका ( ३ वर्षाचा अभ्यांसक्रम ) किंवा शासन मान्य संस्थेची समाजकल्यांणची पदवी ( बी.एस.डब्ल्यू.) किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता आणि कृषी पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम किंवा कृषी विषयांची पदवी किंवा उच्च अर्हता धारण करणा-या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामिण अनुभव असलेल्या उमेदवरांना अधिक पसंती<br>संगणक हाताळणी वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (बांधकाम) | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील असे उमेदवार |
| ७ | कनिष्ठ अभियंता (यांत्रीकी) | यंत्र अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील असे उमेदवार |
| ८ | मुख्य सेविका / पर्यवेक्षिका | ज्या महिला उमेदवारांनी एखादया संविधिक विद्यापीठाची, खास करुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण किंवा समाजशास्त्र या विषयातील स्नातक ही पदवी धारण केलेली आहे. तसेच महिला व बालविकास विभागाकडील शासन अधिसुचना दिनांक ४ जुन २०२१ नुसार ज्यांनी पदवी धारण केली असेल असे उमेदवार . |

| | | |
|---|---|---|
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | (दोन) (अ) संविधिक विद्यापीटाची, पशुवैद्यक शास्त्रातील पदवी धारण करीत असलेल्या व्यक्ती, किंवा<br>( ब ) पशुधन पर्यवेक्षक ,पधुपाल,पशुधन सहाय्यक , सहाय्यक पशुधन विकास अधिकारी,किंवा पशुधन विकास अधिकारी (ब श्रेणी ) या बाबतची पशुसंवर्धन संचालनालयाने दिलेली पुढील पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणा-या व्यक्ती.<br>(१)त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशुवैद्यक पशुपाल प्रशिक्षण अभ्यासक्रम;<br>(२) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणी राज्यातील विविध सांविधीक कृषी विदयापीठे यांनी चालविलेला पधुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम<br>(३) पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांनी चालविलेल्या पशुवैदयक व पशुसंवर्धन शास्त्रामधील दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम (आणि)<br>(४) खालील संस्थांनी चालविलेला पशुवैद्यक शास्त्र विषयासह दुग्धशाळा व क्षेत्र व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका या मधील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम,<br>(एक)महाराष्ट्र तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, किंवा<br>(दोन) राज्यातील विविध संविधीक कृषी विद्यापीठे किंवा<br>५) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठ नागपूर यांच्या मार्फत चालविण्यांत येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्ध उत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ज्याने मुख्य विषय म्हणुन भौतीकशास्त्र किंवा रसायनशास्त्र अथवा जीवशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र अथवा प्राणीशास्त्र किंवा सुक्ष्म जीवशास्त्र यासह विज्ञान विषयामध्ये पदवी धारण केली असेल अशा उमेदवारातून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. (परंतु हाफकिन संस्थेच्या वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रामध्ये पदविका धारण करीत असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल) |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | मान्यता प्राप्त विद्यापीटाची पदवी धारण करीत असतील या बाबत लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणा-या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखा विषयक कामांचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यांत येईल. |
| १२ | विस्तार अधिकारी (कृषि) | ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापिठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांची नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यांत येईल. परंतू कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषि विषयक कामाचा अनुभव किंवा कृषी पध्दतीचे व्यवसायाचे ज्ञान व ग्रामिण जीवनाचा अनुभव असेल अशा उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम / लघु पाटबंधारे ) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार संविधीमान्य तत्सम खालील पाठ्यक्रम<br>१) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एक वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा २) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन ( वास्तुशास्त्रीय आरेखक) किंवा ३) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) किंवा ४) आरेखक ( स्थापत्य ) हा दोन वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा ५) सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र.किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मध्ये पदविका,पदवी,पदव्यूत्तर पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. |
| | उपरोक्त नमूद केलेली शैक्षणिक अर्हता या मध्ये काही विसंगती असल्यांस सेवाप्रवेश नियम, शासन निर्णय, शासन परिपत्रक , शासन अधिसूचना या अंतीम राहतील. | |

| | |
|---|---|
| | अनुभव<br>१. वरील सर्व पदांच्या मुळ कागदपत्रे तपासणीवेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये उपरोक्त नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीमध्ये नमूद अनुभवामधील प्रशासकीय कर्तव्ये व जबाबदा-या यांचे स्वरूप असलेला अनुभव नमूद करणे आवश्यक आहे.तसेच अनुभव सिध्द करणारे दस्तऐवज सादर करणे आवश्यक राहील.<br>२. महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक -एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ०३/०७/२००४ अन्वये नियुक्तीसाठी विहित केल्यानुसार अनुभव ग्राहय धरणेत येईल. |

**वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाहिक अर्हता खालीलप्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाहिक अर्हता | तपशील |
|---|---|---|
| १ | संगणक अर्हता | कंत्राटी ग्रामसेवक व पशुधन पर्यवेक्षक पदासाठी शासन निर्णय ,माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) क्र मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार संगणक /माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.परंतू इतर पदांसाठी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसल्यांस , शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण २०००/प्रक्र६१/२००१/३९ दिनांक १९/०३/२००३ नूसार संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासुन २ (दोन ) वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील. |
| २ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील विहीत नमून्यातील प्रतिज्ञापन नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापनामध्ये नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.<br>या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटूंब याचा अर्थ दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे. |

## ८ .पदनिहाय वेतनश्रेणी

८.१ सरळसेवेने भरावयाच्या पदांची वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | एस-१३ ( ३५४००-११२४०० ) |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष)५०% ( हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी ) | एस-८ ( २५५००-८११०० ) |
| ३ | आरोग्य परिचारीका (आरोग्य सेवक (महिला) ) | एस-८ ( २५५००-८११०० ) |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | एस-१० ( २९२००-९२३०० ) |
| ५ | ग्रामसेवक (कंत्राटी) | मानधन दरमहा रु १६०००/- |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (बांधकाम ) | एस-१४ ( ३८६००-१२२८०० ) |
| ७ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | एस-१४ ( ३८६००-१२२८०० ) |
| ८ | मुख्य सेविका / पर्यवेक्षिका | एस-१३ ( ३५४००-११२४०० ) |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | एस-८ ( २५५००-८११०० ) |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | एस-१३ ( ३५४००-११२४०० ) |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | एस-८ ( २५५००-८११०० ) |
| १२ | विस्तार अधिकारी (कृषी) | एस-१३ ( ३५४००-११२४०० ) |
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम/लघु पाटबंधारे ) | एस-८ ( २५५००-८११०० ) |

## ९. परीक्षेचे स्वरूप व दर्जा व निवडीची कार्यपध्दती

९.१ सर्व पदांसाठीचे परीक्षेचे स्वरूप व दर्जा **परिशिष्ठ २** मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

९.२ सर्व पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.

९.३ ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहीत करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

९.४ ज्या पदांकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

९.५ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, या तांत्रिक संवर्गातील पदांच्या तांत्रिक भागाचे प्रश्न इंग्रजी माध्यमातुन राहतील.

९.६ इतर सर्व संवर्गासाठीचे तांत्रिक व इतर प्रश्न हे मराठी व इंग्रजी माध्यमातून राहतील

९.७ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात आयोजित केली जाईल. प्रत्येक प्रश्नास एकूण २ गुण याप्रमाणे १०० प्रश्नांसाठी २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्याकरीता १२० मिनीटे इतका कालावधी देण्यात येईल.

९.८ गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

९.९ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेणेत येणार असल्यामुळे परीक्षेची प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका यांची प्रत उमेदवारांना मिळणार नाही.

९.१० ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका पुनःतपासणी करणेत येणार नाही ,याबाबत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे जिल्हा परिषद अथवा कंपनीशी संपर्क साधू नये.

९.११ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं २२२/प्रक्र.५४/कां.१३-अ दिनांक ४ मे २०२२ अन्वये गट क मधील पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही.

९.१२ उमेदवारांना परिक्षेकरीता अर्ज करतांना कोणतेही कागदपत्रे सादर करण्यांची आवश्यकता नाही.

९.१३ तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश होणा-या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरीता पाचारण करणेत येईल.त्याबाबतची यादी व वेळापत्रक **मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील संकेतस्थळ https://dhule.gov.in** व **https://dhulezp.mahapanchayat.gov.in** **या धुळे जिल्हा परिषदेच्या** संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

९.१४ कागदपत्रे पडताळणीसाठी सर्व मुळ कागदपत्रे व त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

९.१५ कागदपत्र पडताळणीनंतर निवड यादी व प्रतिक्षा यादी **मा.जिल्हाधिकारी कार्यालय धुळे** येथील **संकेतस्थळ https://dhule.gov.in** व **https://dhulezp.mahapanchayat.gov.in** **या धुळे जिल्हा परिषदेच्या** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

९.१६ कागदपत्र पडताळणीकरिता ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र,पारपत्र,पॅनकार्ड,वाहन परवाना (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक स्वसाक्षांकित छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

## परिशिष्ठ - २

## सरळसेवेने भरावयाच्या पदांच्या परिक्षेचे स्वरूप व दर्जा

| अ .क्र . | पदाचे नांव /संवर्ग | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बुध्दीमापन व गणित | तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | |
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | विज्ञान व आरोग्य संबंधी | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष )५०% हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | आरोग्य सेवाविषयक | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |

| अ.क्र. | पदाचे नांव /संवर्ग | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बुध्दीमापन व गणित | तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | |
| ३ | आरोग्य परिचारिका / [ आरोग्य सेवक (महिला) ] | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | आरोग्य सेवाविषयक | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | औषध शास्त्र संबधी पदविका दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी | | | |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | १२ वी | १२ वी | कृषी पदविका दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | स्थापत्य अभियांत्रीकी पदविका दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी | | | |
| ७ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | यंत्र अभियांत्रीकी पदविका दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी | | | |

| अ.क्र. | पदाचे नांव /संवर्ग | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बुध्दीमापन व गणित | तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | |
| ८ | मुख्य सेविका / पर्यवेक्षिका | २५ | २५ | २५ | २५ | ० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | | |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | पदवीका दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | पदवी दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | इंग्रजी | | | |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | लेखा विषयक प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |
| १२ | विस्तार अधिकारी (कृषी) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १२ वी | १२ वी | पदवी | पदवी | कृषीसंबधी प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |
| १३ | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (बांधकाम / लघु पाटबंधारे ) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | १२० मिनिटे |
| | काठिण्य पातळी | १० वी | १० वी | १० वी | १० वी | पदवीका दर्जाचे प्रश्न | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | मराठी व इंग्रजी | | | |

## १०. परिक्षेचे वेळापत्रक

१०.१ परिक्षेचे वेळापत्रक हे https://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/ व https://dhule.gov.in तसेच https://dhulezp.mahapanchayat.gov.in या धुळे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. त्याकरिता उमेदवारांनी वारंवार संकेतस्थळाला भेट देऊन खात्री करणे आवश्यक राहील.

## ११. उमेदवारांना समान गुण मिळाल्यास

११.१ उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळाल्यास परीक्षेचा निकाल तयार करतांना गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

अ) आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

ब) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) वरील अ.क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास उच्चस्तर शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

ड) वरील अ.क्र. (अ), (ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहीत असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्रथम प्राधान्यक्रम देण्यात यावा.

टिप - (आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य म्हणजे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दि. २३ जानेवारी २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतक-याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.)

**संबधीत उमेदवारांनी सदरचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे.**

## १२. निवडसुचीची कालमर्यादा

१२.१ निवड समितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करतांना ज्या दिनांका पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

## १३. उमेदवारांचे अधिवासाबाबत

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | अधिवास (Domicile) प्रमाणपत्र आवश्यक |
| क ) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.मकसी१००७/प्रक्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषीक उमेदवारांना वरील पदांसाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवरांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्यांचा सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील . सदर उमेदवांना सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय ठरत नाही. |

१४. वयोमर्यादा

१४.१ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या/१२, दि. ०३ मार्च २०२३ अन्वये शासन सेवेत नियुक्तीसाठीच्या कमाल वयोमर्यादेत दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत दोन वर्ष इतकी शिथिलता देण्यात आलेली आहे.

१४.२ दि. ०३ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार दि. २५ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयात विहीत केलेल्या कमाल वयोमर्यादेत (खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्ष) दोन वर्ष इतकी शिथिलता (खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागास प्रवर्गासाठी ४५ वर्ष.) देण्यात आलेली आहे.

१४.३ ज्या पदासाठी संबधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहीत केलेल्या कमाल वयोमर्यादेपेक्षा भिन्न कमाल वयोमर्यादा विहीत केली आहे, अशा पदांसाठी देखील दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत कमाल वयोमर्यादेत दोन वर्ष इतकी शिथिलता देण्यात आलेली आहे.

१४.४ दि. ०३ मार्च २०२३ अन्वये शासन सेवेत नियुक्तीसाठीच्या कमाल वयोमर्यादेत देण्यात आलेली शिथिलता ही दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंतच लागू राहील.

१४.५ सामाजिक व समांतर आरंक्षण निहाय वयोमर्यादा

| अ.क्र. | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | दि. ०३ मार्च २०२३ अन्वये सुधारित वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | १८ | ३८ | ४० |
| २ | मागासवर्गीय उमेदवार | १८ | ४३ | ४५ |
| ३ | दिव्यांग उमेदवार | १८ | ४५ | ४७ |
| ४ | प्रकल्पग्रस्त | १८ | ४५ | ४७ |
| ५ | भूकंपग्रस्त | १८ | ४५ | ४७ |
| ६ | अंशकालीन | १८ | ५५ | ५७ |
| ७ | माजी सैनिक | सशस्त्र दलात केलेली सेवा + ३ वर्ष | | सशस्त्र दलात केलेली सेवा +३ वर्ष +२ वर्ष |
| ८ | माजी सैनिक (दिव्यांग) | ४५ | | ४७ |
| ९ | खेळाडू | १८ | ४३ | ४५ |
| १० | अनाथ | १८ | ४३ | ४५ |
| ११ | • स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य<br>• १९९१ चे जनगणना कर्मचारी<br>• १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी<br>• शासकीय कर्मचारी / जि.प.कर्मचारी | १८ | ४५ | ४७ |

१४.६ संवर्गनिहाय वयोमर्यादा

| अ.क्र. | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | दि. ०३ मार्च २०२३ अन्वये सुधारित वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य सेवक (महिला) खुला प्रवर्ग | १८ | ४० | ४२ |
| २ | आरोग्य सेवक (महिला) मागास प्रवर्ग | १८ | ४३ | ४५ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% | १८ | ४५ | ४७ |
| ४ | पर्यवेक्षिका (सरळसेवा) | २१ | ३८ खुला प्रवर्ग, ४३ मागास प्रवर्ग | ४० खुला प्रवर्ग ४५ मागास प्रवर्ग |

१४.७ **दि. २५ ऑगस्ट २०२३** रोजीचे उमेदवाराचे वय ग्राहय धरणेत येईल.

**१५. मार्च २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे अर्ज केलेल्या उमेदवारांबाबत.**

**१५.१** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दि. २१ ऑक्टोबर २०२२ अन्वये मार्च २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज केलेले / भरलेले आहेत व सध्या वयाधिक्य झाले असल्याने ते परीक्षेस बसण्यास अपात्र होऊन अशा उमेदवारांचे नुकसान होऊ नये, याकरिता अशा उमेदवारांचे अर्ज स्वीकारून फक्त या परिक्षेस बसण्याकरिता अशा उमेदवारांना वयोमर्यादेत सुट देण्यात येत आहे.परंतु यासाठी उमेदवाराने नव्याने अर्ज करणे बंधनकारक राहील.

**१५.२** त्यानुसार सन २०२३ मध्ये घेणेत येणा-या सरळसेवा भरती प्रक्रियेकरीता ज्यांनी मार्च २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे अर्ज भरलेले होते. व त्यांचे वयाधिक्य झालेले आहे, अशा उमेदवारांना वयामध्ये सूट देणेत येऊन या परीक्षेकरीता पात्र समजणेत येईल.

**१५.३** सन २०२३ च्या जाहिरातीनुसार वयामध्ये सूट मिळविण्यासाठी उमेदवारांनी अर्ज भरतांना मार्च २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे अर्ज केला असलेबाबत अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

**१६. सामाजिक व समांतर आरक्षण**

**१६.१** खुल्या प्रवर्गातील आर्थिकष्टया दुर्बल घटक.

१६.१.१ सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेले आहे

१६.१.२ खुल्या प्रवर्गाव्यतिरीक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञये नाही.

१६.१.३ या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या / उमेदवारांच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटूंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापुर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

१६.१.४ उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहीत नमुन्यातील निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

## १६.२ महिला आरक्षण

१६.२.१ महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२,दि.०४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर शासन निर्णयान्वये रद्द करणेत आलेली आहे.

१६.२.२ मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती (ब ),भटक्या जमाती (क),भटक्या जमाती (ड) आणि विशेष मागास प्रवर्गातील या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यांत आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६.२.३ महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करून घेणेत येईल.

१६.२.४ महिलांकरिता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरूष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

## १६.३ खेळाडू

१६.३.१ शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दि.०१ जुलै,२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ शासन निर्णय दि.३० जुन २०२२ आणी तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडूंबाबत आरक्षण, क्रिडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१६.३.२ उमेदवाराने सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा संबधित प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर न केल्यास त्याच टप्प्यावर खेळाडू आरंक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल.

१६.३.३ खेळाडू आरक्षणासाठी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

१६.३.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

## १६.४ माजी सैनिक

१६.४.१ शासन परिपत्रक साप्रवि क्र. आरटीए १०७९/४८२/१६-अ दिनांक १६.०४.१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

१६.४.२ माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशिल दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

१६.४.३ तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१६.४.४ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. आरटीए १०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८/मुंबई दि. ३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणा-या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणूकीसाठी दुस-यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

१६.४.५ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २ सप्टेंबर १९८३ अन्वये

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करतांना युध्द काळात आणि युध्द नसतांना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यांस असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब) युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५% आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील.तथापि,सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

## १६.५ प्रकल्पग्रस्त

१६.५.१ शासन निर्णय साप्रवि क्र. एईएम १०८०/३५/१६ अ दिनांक २०.०१.१९८० व शासन निर्णय साप्रवि क्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे

१६.५.२ प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१६.५.३ उमेदवारांने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## १६.६ भुकंपग्रस्त

१६.६.१ शासन निर्णय साप्रवि क्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ भुकंपग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे

१६.६.२ उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

१६.६.३ उमेदवारांने सदर भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## १६.७ पदवीधर /पदविकाधारक अंशकालीन उमेदवार

१६.७.१ शासन निर्णय दि. २७ ऑक्टोबर २००९ अन्वये पदविधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे

१६.७.२ रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे

१६.८ अनाथ

**१६.८.१** अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांक -अनाथ-२०१८/प्र.क्र.१२२/का-३ दि. ६ एप्रिल २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहिल.

**१६.८.२ अनाथांसाठी ''संस्थात्मक'' व ''संस्थाबाहय'' अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील.**

**१६.८.३ संस्थात्मक आरक्षण**

१. संस्थात्मक आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्ष पुर्ण होण्यापुर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थामध्ये पालन पोषण झाले अशा बालकांचा समावेश असेल (तसेच महिला व बाल विकास विभागातर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाची संबंधीत संस्थामध्ये तसेच महिला व बालविकास विभागाव्यतीरीक्त अन्य विभागाकडून मान्यता प्रदान करणेत आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये पालन झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल )

१६.८.४ **संस्थाबाहय आरक्षण**

१. संस्थाबाहय आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्ष पुर्ण होण्यापुर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेबाहेर/ नातेवाईकाकडे संगोपन झालेले आहे अशा बालकांचा समावेश असेल.

१६.८.५ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांकडे महिला व बालविकास विभागाकडून निर्गमित करणेत आलेले अनाथ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१६.८.६ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणा-या उमेदवारांला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपांत नियुक्ती देण्यांत येईल.

१६.८.७ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यांत येईल.

१६.९ दिव्यांग

**१६.९.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**१६.९.२** दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**१६.९.३** दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग / पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

**१६.९.४** दिव्यांग आरक्षणाच्या पात्रतेकरीता दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

**१६.९.५** दिव्यांग व्यक्तीकरीताचे आरक्षण एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येईल.

१६.९.६ सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद हे इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येईल.

१६.९.७ दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या व्यक्तीने केंद्र शासनाच्या **www.swavlambancard.gov.in** या संकेतस्थळावरुन सक्षम प्राधिका-याने वितरीत केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६.९.८ दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरीता संबधित जातीचे वैध कालावधीचे नॉन-क्रिमिलेअर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

१६.९.९ लेखनिक व अनुग्रह कालावधी

१. लक्षणिय दिव्यागत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/ दि.क.२/दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ अन्वये जारी करण्यांत आलेल्या लक्षणीय ( Benchmark ) दिव्यांग व्यक्तींबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका -२०२१ तसेच तदनतर शासनाचे निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

२. प्रत्यक्ष परीक्षेवेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या,पात्र दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात ( ७ ) दिवसांच्या आंत आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रासह विहित नमुन्यामध्ये या कार्यालयांकडे लेखी विनंती करून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने लेखनिक पुरविण्याची मागणी केल्यानुसार त्यांना जिल्हा परिषदेमार्फत लेखनिक पुरविण्यांत येईल.यासाठी उमेदवाराने जाहिरातीसोबत जोडणेत आलेले APPENDIX - I व लेखनिक पुरविण्यासाठीचा अर्ज दिनांक २५/०८/२०२३ पर्यंत जिल्हा परिषद,धुळेच्या **dyceo.gen@gmail.com** या ई-मेल वर सादर करणे आवश्यक राहील.

४. अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच शासनाची विहीत पध्दतीने पुर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही, अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

५. परिक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यांत येईल.तसेच लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीच्या परवागनीबाबत संबंधित उमेदवाराला नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यांत येईल.

६. प्रत्यक्ष परीक्षेवेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी प्रसिध्द करण्यांत आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापुर्वी कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेल्या दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

७ परिक्षेकरीता लेखनिकाची मदत घेण्यासाठी परवानगी देण्यांत आलेल्या लक्षणीय ( Benchmark ) दिव्यागत्व असलेल्या व्यक्तींना परिक्षेसाठी देण्यांत येणारा अनुग्रह कालावधी ( भरपाई वेळ ) हा प्रती तास २० मिनिटांपर्यंत राहील.

१६.९.१० सामान्य प्रशासन विभाग ,शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्रक्र ११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ शारीरीक दृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४% आरक्षण विहित करणे व आरक्षण अंमलबजावणी करण्यांचे निर्देश आहेत .त्यानुसार महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक

२२ फेब्रुवारी २०२१,दिनांक ०८ एप्रिल २०२१ व दिनांक १३ सप्टेंबर २०२१ नुसार पदांकरीता दिव्यांगांसाठीची पदे खालील प्रमाणे सुनिश्चित करणेत आलेली आहेत. त्याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | कार्यात्मक आवश्यकता (गरज) | अपंगत्वाच्या प्रकारानुसार पात्रता निकष | |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | S,ST,W,MF,RW, SE,H | A | LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OA.BA,OL,CP,LC,Dw,AAV |
| | | | D | SLD |
| | | | E | MD Involving (a) to (d) above |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी ) | S.ST.W.MF.RW. SE.H | A | LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OL,CP,LC,Dw,AAV |
| | | | D | SLD,MI |
| | | | E | MD Involving (a) to (d) above |
| ३ | आरोग्य परिचारिका [आरोग्य सेवक (महिला) ] | S.ST.W.MF.RW. SE.H | A | LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OL,CP,LC,Dw,AAV |
| | | | D | SLD,MI |
| | | | E | MD Involving (a) to (d) above |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | S,ST,W,BN,L ,KC,PP, MF, RW,SE,H | A | D,HH |
| | | | B | OL,BL,CP,LC,Dw,AAV |
| | | | C | ASD(M),SLD,MI |
| | | | D | MD Involving (a) to (c) above |
| ५ | कंत्राटी ग्रामसेवक | S,ST,W,BN,L,PP, RW,SE,H,C | A | B,LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OL,OA,LC,DW,AAV, Mdy(M) |
| | | | D | MI |
| | | | E | MD including a to d |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) ( बांधकाम ) | S,ST,W,BN,MF, RW,SE,H,C | A | LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OA,BA,OL,BL,Dw,AAV |
| | | | D | SLD,MI |
| | | | E | MD Involving (a) to (d) above |
| ७ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | S,ST,W,BN.KC, MF,RW,SE,H,C | A | LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OA,BA,OL,LC,Dw,AAV |
| | | | D | ASD(M),SLD,MI |
| | | | E | MD Involving (a) to (d) above |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मुख्य सेविका / पर्यवेक्षिका | S,ST,W,BN,L ,PP,RW,SE,H,C | A | HH |
| | | | C | OL,LC,DW,AAV,LC |
| | | | D | ASD(M),MI(M) |
| | | | E | MD including a to d |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | S,ST,W,BN,L, PP,RW,SE,H,C, | A | HH |
| | | | C | OA,LC,DW,AAV,LC |
| | | | D | ASD(M),MI(M) |
| | | | E | MD including a to d |
| १० | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | S,ST,W,BN, MF,RW,SE,H, C | A | D,HH |
| | | | B | OL,BL,Dw,AAV |
| | | | C | ASD(M),SLD,MI |
| | | | D | MD Involving (a) to (d) above |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | S.W.MF,SE ,RW,H,C | A | B,LV |
| | | | B | D,HH |
| | | | C | OA,OL,BL,CP,LC,Dw,AAV |
| | | | D | ASD(M),SLD,MI |
| | | | E | MD Involving (a) to (d) above |
| १२ | विस्तार अधिकारी (कृषी) | S,ST,W,BN,L ,PP,RW,SE,H,C, | A | LV |
| | | | B | HH |
| | | | C | OA,OL,DW,AAV,LC |
| | | | D | ASD(M),MI(M) |
| | | | E | MD including a to d |
| १३ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम / लघु पाटबंधारे.) | S,ST,W,BN,L, PP,RW,SE,H,C | A | LV |
| | | | B | HH |
| | | | C | OL,OA,LC,DW,AAV,MDy (m) |
| | | | D | SLD,ASD,(M),MI(M) |
| | | | E | MD including a to d |

Abbreviations :

| Sr. No | Abbreviations | Long Form | Sr. No | Abbreviations | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| १ | S | Sitting | ७ | H | Hearing |
| २ | ST | Standing | ८ | BN | Bending |
| ३ | W | Walking | ९ | L . | Lifting |
| ४ | MF | Manipulation by Fingers | १० | KC | Kneeling Crouching |
| ५ | RW | Reading & Writing | ११ | PP | Pulling & Pushing |
| ६ | SE | Seeing | १२ | C | Communication |

Category Abbreviations:

| Sr. No | Abbreviations | Long Form | Sr. No. | Abbreviations | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| १ | LV | Low Vision | ११ | AAV | Acid Attaack Victims |
| २ | D | Deaf | १२ | SLD | Specific Learning Disability |
| ३ | HH | Hard of Hearing | १३ | MD | Multiple Disabilities |
| ४ | OA | One arm | १४ | BL | Both Leg |
| ५ | BA | Both arm | १५ | ASD (M) | Autism Spectrum Disorder (M= Mid) |
| ६ | OL | One Leg- | १६ | MI | Mental Iilness |
| ७ | CP | Cerebral Palsy | १७ | B | Blind |
| ८ | LC | Leprosy Cured | १८ | Mdy | Muscular Dystrophy |
| ९ | Dw | Dwarfism | १९ | MI(M) | Mental Iliness |
| १० | OAL | One arm and one leg | २० | ASD | Autism Spectrum Disorder |
| २१ | ID | Intellectual Disability | | | |

## १७. सर्वसाधारण सूचना

१७.१ ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. **(माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही)** तसेच प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू अशी इच्छूक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे

आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत व त्यांना याबाबत कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१७.२ अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक विनावेतन व तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरीक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

१७.३ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णय दिनांक १२.१२.२०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ०६ महिन्यांचे आत, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबधित उमेदवारांना सेवेतून कमी करण्यांत येईल.

१७.४ वि.जा.(अ)/ भ.ज.(ब)/भ.ज.(क)/भ.ज.(ड)/वि.मा.प्र., इमाव, ईडब्ल्युएस या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिना-या उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याने दिलेले अलिकडील /नविनतम मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्यांच्या शेवटच्या दिनांका पर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची पडताळणी कागदपत्र तपासणीच्या वेळी करण्यांत येईल.

१७.५ शासन परिपत्रक ,सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग , सीबीसी-२०१२ / प्र.क्र.१८२/ विजाभज-१, दिनांक २५ मार्च २०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक संबंधीत जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्विकारण्यांच्या अंतिम दिनांक संबंधीत उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती /गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यांत येईल.

१७.६ शासन परिपत्रक , सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ,सीबीसी-२०१३/ प्र.क्र.१८२/ विजाभज -१/ दिनांक १७ ऑगस्ट २०१३ अन्वये जारी करण्यांत आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन- क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यांत येईल.

१७.७ अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह ) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारसीकरिता विचार होत असल्याने ,सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी , अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१७.८ शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाच्या आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

१७.९ ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परीक्षेस,बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास किंवा खोटी माहिती